VOL- X | ISSUE- VIII | AUGUST | 2023 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.367 | ISSN 2349-638x

# महानुभाव पंथाचे तत्वज्ञान आणि दामोदर पंडिताचे व्यक्तिमत्व

**डॉ. बालाजी विट्ठलराव डिगोळे**
मराठी विभाग,
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव ता.चाकूर जि.लातूर

दामोदर पंडित हे महानुभाव पंथाचे एकनिष्ठ प्रसारक होते. चक्रधराच्या तत्त्वज्ञानाचा त्यांनी सखोल अभ्यास केला. त्यांच्या वच्छाहरण काव्यात महानूभाव पंथाच्या तत्वज्ञानाचा सूक्ष्म प्रभाव दिसून येतो. वैदिक परंपरेतील प्रत्येक ग्रंथाचा प्रारंभ गणपतीच्या स्तवनाने होतो . जसे 'विवेकसिंधू', 'ज्ञानेश्वरी', 'भावार्थ रामायण', 'पांडवप्रताप', इ. ग्रंथाचा गणेश, शारदा यांच्या स्तवनाने होतो. पण दामोदर पंडिताच्या वच्छाहरणाचा प्रारंभ श्रीचक्रधरांच्या स्तवनाने होतो. महात्मा चक्रधर, गोविंदप्रभु, नागदेवाचार्य इ. चा आदरपूर्वक उल्लेख करून कवीने कथेचा प्रारंभ केला आहे. नागदेवाचार्य हे तर त्यांचे गुरूच होते. त्यांची ही स्तुती कवीने या काव्याच्या प्रारंभी गायिलेली आहे. हा महानुभाव पंथाचा प्रारंभ अगदी स्पष्टपणे दिसून येतो. कवीचे चक्रधर प्रेम या काव्यात जागोजागी उचंबळून येते. चक्रधर, चक्रपाणी या शब्दांचा श्लेषार्थी उपयोग कवीने या काव्यात अनेक ठिकाणी केला आहे. श्लेषार्थी याचा अर्थ म्हणजे महात्मा चक्रधर होय आणि दुसरा अर्थ सुदर्शन चक्र धारण करणारे श्रीकृष्ण होय. या काव्यात जागोजागी कवीने श्रीकृष्णांच्या वर्णनासाठी चक्रपाणी, चक्रधर या शब्दाची योजना करून चक्रधर प्रेम व्यक्त केले आहे. चक्रधरांच्या दिनचर्येत 'मर्दन' (मालिश), मादन (आंघोळ), आरोगन (जेवण), विडा, 'पासवडी' (पांघरुण) इ. उपचारांचा समावेश आहे. "घरोघरी परगुणे । होतसे मर्दना मदना । दिव्ये लावीता चंदने । सुगंधा पुष्पाजाती ।। खडूरसी होतसे आरोगन । ओवाळणीया निंबलोन । विडा देऊनि चरणसहवान । करिताती" श्रीकृष्णाच्या रूपातील गोपाळांना गोकुळात जे-जे उपचार घरोघरी होत होते. त्याचे चक्रधरांच्या उपचाराशी विलक्षण साम्य दिसून येते. महानुभाव पंथाच्या तत्वाज्ञानात देवता नित्यबद्ध आहेत. असे मानले जाते. परमेश्वराव्यतिरिक्त बाकीच्या सर्व देवदेवतांना महानुभाव पंथात दुय्यम स्थान आहे. त्या देवता ईश्वराच्या शक्ती असून त्यांनासुद्धा उद्धारासाठी ईश्वरास अनुसरावे लागते. असे महानुभाव पंथ मानतो. वच्छाहरण या काव्यात या मताची छाप दिसून येते. ब्रह्मदेव हा परमेश्वराच्या अज्ञानामूळेच श्रीकृष्णाची परीक्षा पाहण्यासाठी आला. पण नंतर त्यास आपली चुक कळून आली. आणि तो श्रीकृष्णाला शरण गेला. अशा तऱ्हेने ब्रह्मदेव ही एक देवता या दृष्टीने कवीने चित्रण केले आहे. परमेश्वराच्या प्राप्तीचे अनेक मार्ग असले तरी परमेश्वराच्या प्राप्तीसाठी श्रीकृष्णालाच शरण गेले पाहिजे. असे महानुभाव पंथ मानतो. जप, तप, तीर्थ, यज्ञ, दान, व्रत, कर्म, इ. मार्ग निरुपयोगी आहेत. कारण यापैकी कोणत्याही साधनाने ईश्वरप्राप्ती होत नाही. त्यासाठी ईश्वराचीच कृपा पाहिजे. आणि ईश्वराच्या कृपेसाठी ईश्वरास शरण जाण्याशिवाय दुसरा मार्ग नाही. असे प्रतिपादन दामोदर पंडितानी ब्रह्मदेवाच्या तोंडी घातलेल्या संभाषणात व्यक्त केली आहे.

"सांडा सांडा अहंकार । अनुसरा श्री चक्रधरा मग जाणाल परापरा विचाराते ॥374॥" परमेश्वराच्या पर आणि आपर या स्वरूपाचे ज्ञान घेण्यासाठी चक्रधराला अनुसरले पाहिजे. असे कवीने सुचविले आहे. ईश्वर आपल्या विज्ञान शक्तीने जे अशक्य वाटते. ते शक्य करून दाखवतात. जे अदृश्य आहे. ते दृश्य करतात. जे अप्राप्त आहे. ते प्राप्त करतात. असे ईश्वराच्या विज्ञान शक्तीचे महत्त्व महानुभाव पंथात मानतात. कवीने आपल्या काव्यात श्रीकृष्णाने आपल्या विज्ञान शक्तिने गायीच्या वासरांची आणि गोपाळांची जशीच्या तशी हुबेहूब रूपे धारण केली. एकच परमात्मा; पण गोकुळात अनेक वासरांच्या व गोपबालकांच्या रूपाने क्रीडा करू लागला. तसेच श्रीकृष्णाने आधासुराला मारण्यासाठी त्याच्या जबड्यात प्रवेश केला आणि अति विशाल रूप धारण केले आणि आधासुराचे शरीर चिरून काढले. अशा तऱ्हेचे वर्णन करून कवीने परमेश्वराच्या विज्ञान शक्तीचे कौतुक

केले आहे. महानुभाव पंथ हा एक भक्ती पंथ आहे. देव आणि भक्त यांच्या प्रेमाला महानुभाव पंथात अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. या दृष्टीने कवीने श्रीकृष्णाच्या प्रेमाची एकापेक्षा एक सुंदर चित्रे या काव्यात रेखाटली आहेत. उदाहरणार्थ एका सकाळी कृष्णाने वृंदावनात वेणुवादन सुरू केले. कृष्णाच्या बासरीचा आवाज ऐकताच गोवर्धन पर्वताच्या पठारावर चरणाऱ्या गाई एकदम पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या वासरांकडे धावत आल्या आणि वासरांना दूध पाजू लागल्या. कृष्णाच्या बासरीचे सामर्थ्य कवीने येथे वर्णन केले आहे. कृष्णाचे सवंगडी गोकुळातील वेडे वाकडे गोपबालक होते. कुणी तोतरे, तर कोणी लंगडे, कोणी बोबडे, तर कुणी एका डोळ्यांनी आंधळे त्यांची नावे सुद्धा पेंद्या, दाम्या, वाकड्या अशी तऱ्हेवाईक होती; पण कृष्णाच्या सहवासात ते देहभान विसरून खेळत असत. चेंडू- फळी, हुंबरी, हामामा असे खेळ खेळत असतात. पक्षांचे आवाज करीत असत. वानरांना वाकोड्या दाखवीत असत. मोराबरोबर नाचत असत. राजहंसाप्रमाणे चालण्याची नक्कल करीत असत. अनेक गमतीदार खेळ खेळत. कृष्णाच्या सहवासाचा आनंद लुटत असत. असे कवीने वर्णन केले आहे. ब्रह्मदेवाने गोपबालक आणि वासरे यांचे हरण केले पण कृष्णाने त्यांची प्रतिरुपे धारण करून सर्व गोकुळात आनंद निर्माण केला. वनभोजनाच्याप्रसंगी कृष्णाने सर्व गोपाळांना ब्रह्म रसाने तृप्त केले. इतकेच नव्हे, तर ब्रह्मादीक देवांना हेवा वाटावा असे परमात्मा सुख श्रीकृष्णाने गोकुळातील स्त्री पुरुष मुले वासरे यांना प्राप्त करून दिले. देवाशी कुणी वैर केले काय? किंवा प्रेम केले काय? त्यांना देव कैवल्याचे सुख देतो. जसे या काव्यात कृष्णाला मारण्यासाठी वैरभावाने अधासूर आला; पण कृष्णाने त्यास मुक्ती दिली. पुतना, जरासंध, शिशुपाल यांनी कृष्णाशी वैर केले; पण कृष्णाने त्यांना मुक्त केले. महानुभाव पंथ असे मानतो की, देव आणि भक्त यांच्यात कायम द्वैत असते. देव हा देवच आहे आणि भक्त हा भक्तच आहे. असे महानुभाव पंथ मानतो. म्हणूनच ब्रह्मदेवाने एक भक्त या नात्याने कृष्णाची अपरंपार स्तुती केली. थोडक्यात वच्छाहरणात एक रसाळ कथा तर आहेच; पण सूक्ष्मपणे पाहिल्यास महानुभाव पंथाचा, तत्त्वज्ञानाचा प्रभाव या काव्यात दिसून येतो. दामोदर पंडितांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक आकर्षक पैलू जाणवतात. एक श्रीकृष्ण प्रेम श्रीकृष्ण भक्ती हा दामोदर पंडितांच्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य घटक आहे व वचन या काव्यातील अनेक प्रसंगात श्रीकृष्ण भक्तीची रंगीबेरंगी कारंजे उडताना दिसतात. वृंदावनाचे वर्णन असो किंवा यमुनेचे वर्णन असो कवीने श्रीकृष्णाच्या उत्कट भक्तीचे उत्कट दर्शन या वर्णनात घडविले आहे. गोपाळासमवेत श्रीकृष्णाचे स्नेहभोजन तसेच वासरे आणि गोपबालक यांची रूपे धारण करून कृष्णाने गोकुळात प्रवेश केला. त्या प्रसंगाचे रसभरीत वर्णन कवी करतो. या प्रसंगात कवीच्या अंतकरणातून भक्तीचा आवेग दिसून येतो. ब्रह्मदेवाने श्रीकृष्णाची स्तुती करताना वचनाच्या प्रत्येक ओळीत श्रीकृष्ण प्रेम दडले आहे. महात्मा चक्रधर यांचा या काव्यात श्रीकृष्णाच्या रूपाने उल्लेख करून कवीने आपली सूप्त चक्रधरनिष्ठाच व्यक्त केली आहे. काव्याच्या आरंभी आवर्जून चक्रधरांना वंदन केले आहे. गोकुळातील कृष्णाच्या लीला वर्णन करताना त्यांना चक्रधरांच्या लीळांचे स्मरण होते. असे स्पष्ट दिसून येते. श्रीकृष्णाचे व्यक्तिमत्व चक्रधराप्रमाणेच आकर्षक होते. हे सांगण्यास कवी विसरत नाही. अर्थात श्लेषार्थाने कवी ते कथन करतो. गुरु प्रेम नागदेवाचार्य हे दामोदर पंडितांचे गुरु होते. त्यांच्याच प्रेरणेने महानुभाव पंथातील अनेक साहित्यिकांनी साहित्य लिहिले. वच्छाहरण काव्याच्या प्रारंभी कवीने नागदेवाचार्यांना आवर्जून वंदन केले आहे. गुरुच्या प्रसादाने आपण परमेश्वराचे स्वरूप जाणू शकतो व वर्णन करू शकतो. असा प्रेमभाव कवी व्यक्त करतो. उत्पन्न पंडित वच्छाहरणातील अनेक संदर्भांवरून दामोदर पंडितांची विद्वत्ता लक्षात येते. महानुभाव पंथाच्या तत्त्वज्ञानावर त्यांचे प्रभुत्व होतेच; पण त्याशिवाय कर्ममार्ग, योगमार्ग, अद्वैत भक्ती इत्यादी साधनांचाही त्यांना परिचय होता. असे दिसून येते. श्रीकृष्ण कथेतील नवरसाचे वर्णन पाहिल्यास कवीचा साहित्यशास्त्राचा व्यासंग लक्षात येतो. संगीत कलेचे ज्ञान, दामोदर पंडित संगीत संगीताचे तज्ञ होते. संगीताचे सामर्थ्य ते जाणून होते. म्हणूनच कृष्णाच्या वेनुवादनाचा सुंदर प्रभाव कवीने चित्रीत केला आहे. पंथनिष्ठा महानुभाव पंथाचे तत्त्वज्ञान या काव्यात गुंफून कवीने पंथनिष्ठा व्यक्त केली आहे. ईश्वराच्या विज्ञान शक्तीचे विद्या शक्तीचे उल्लेख या काव्यात आले आहेत. देवता परमेश्वरापेक्षा दुय्यम आहेत. ही कल्पना यात आली आहे. परमेश्वराचा वेध चराचरास लागतो. ही कल्पना या काव्यात दिसून येते. परमेश्वरावाचून जीवनाचा उद्धार होत नाही. हेही कवीने चित्रीत केले आहे. दामोदर पंडित केवळ रुक्ष पंडित

नव्हते तर ते एक रसिक कवी होते. त्यांचे वच्छाहरण हे काव्य भक्तीरसाने भिजून चिंब झाले आहे. अनेक दृष्टांत, रूपके, उपमा यांचा वापर करून कवी आपला भाव उत्कट बनवतो. वृंदावनाचे वर्णन करताना कृष्णाची लढाई आकाशात उमटली आहे. असे कवी वर्णन करतो. यमुना नदीच्या पाण्यावर ज्या लाटा होत्या. त्या जणू काही कृष्णाला आलिंगन देण्यासाठी पसरलेल्या अरुंद भुजाच होत्या. त्याप्रमाणे हरी कथेतील रस भक्तांनाच भोगता येतो. अशी सुंदर कल्पना करून कवीने आपल्या रसिक वृत्तीचे दर्शन घडविले आहे. मित्र प्रेम केशिराजबास हे दामोदर पंडितांचे जिवलग मित्र होते. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांची आठवण म्हणून कवीने वच्छाहरण हे काव्य लिहिले. विशेष म्हणजे या काव्यात कवीने केशिराजबासाचे नाव घेतले आहे. "म्हणे मुनी केशीराज मने l केशिराजु मनु l" असा उल्लेख ओवी क्रमांक 6, 32, 377, 375, 502 यात आला आहे. हे काव्य दामोदर पंडितांनी लिहिले; पण त्याचे कर्तृत्व आपल्या मित्रास दिले. हे या उल्लेखावरून दिसून येते. काव्याच्या शेवटी दामोदर पंडिताने आपले नाव टाकले. म्हणूनच वच्छाहरण हे काव्य दामोदर पंडितांचे काव्य आहे. याचा उलगडा होतो. अन्यथा हे काव्य केशीराजबासाचेच आहे . असे कुणालाही वाटेल. थोडक्यात दामोदर पंडितांच्या व्यक्तिमत्त्वाची अनेक विलोभनीय वैशिष्ट्ये या काव्यात आढळतात.

**संदर्भग्रंथ :-**

1. (संपा.) वि. भि. कोलते, 'वच्छाहरण', इ.स. 1953
2. शिवाजी गऊळकर, 'प्राचीन मराठी आख्यानकविता : उद्गम आणि विकास', निर्मल प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती, 2000
3. अ.ना.देशपांडे, 'प्राचीन मराठी वाङ्.मयाचा इतिहास' (भाग पहिला), व्हीनस प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, 1995
4. प्र. न. जोशी, 'प्राचीन मराठी वाङ्.मयाचा विवेचक इतिहास', प्रसाद प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, 1978
5. ल.रा.नसिराबादकर, 'प्राचीन मराठी वाङ्.मयाचा इतिहास', फडके प्रकाशन, कोल्हापूर, सहावी आवृत्ती, 1997
6. डॉ. यशवंत साधू, यांनी केलेले मार्गदर्शन, इ.स. 2000